Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED AND INDEXED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# INDIA @75

... Guest Editor ...

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

... Jointly Organized by ...

*Pravara Medical Trust's,*

**Arts, Commerce & Science College, Shevgaon**

**Dist. Ahmednagar – 414502**

***Printed by :*** Academic Book Publications, Jalgaon

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ March 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal
Multidisciplinary International E-Research Journal

Printed by

## Academic Book Publications

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
E-mail : academicbooksjalgaon@gmail.com
Ph.: (0257) 2235520, 2232800. Mob.: 91752 85943, 88308 24241.

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

# : C O N T E N T S :

1. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ........ 1
Dr. Mangesh Shirsath

2. **MSME (Micro, Small, and Medium Enterprises) Business in India** ........ 4
Dr. Renuka M. Suryawanshi, Dr. Santosh D. Pawale

3. **Allelopathic effect of Cassia tora on Economic Legumes (Cicer arietinum, Vigna radiata And Glycine max)** ........ 9
Samidha S. Halnar, Harshali R. Dighe

4. **Impact of Covid – 19 on Agriculture** ........ 11
G. M. Bodakhe, R. D. Shelke, R. A. Thombare

5. **Growth Factors and Challenges before Gold Industry in India** ........ 20
Prof. Dr. Sanjay Laxman Argade, Sapna Balkrushna Shahane

6. **Water Pollution and Treatment Method** ........ 22
Jyoti Kadubal Khandagale

7. **Role of Social Media in India** ........ 26
Meherarti Bade

8. **Role of Social Media in India** ........ 29
Varsha D. Dhamale

9. **Artificial Intelligence : The Future** ........ 32
Ashwini Shivajirao Doifode

10. **Effect on Mycorrhizal Fertilizer on Tomato with Respect to**
11. **Some Morphological and Biochemical Aspect** ........ 37
Sunita Bhagavan Gadekar

12. **Cultural Diversification in Post - Interdependence Period** ........ 40
Hemalata Prakash Joshi

13. **Digital Marketing Trends in India** ........ 44
Komal Ramkrushna Kale

14. **The comparatively study of Nano nanocrystalline Tin Oxide SnO2 & Fluorine doped tin oxide SnO2: F thin films for Solar cell Applications.** ........ 49
B. L. Khatik, G. A. Agale, Dr. R. N. Arle

15. **Management and Utilization of Wells and Borewells in Agriculture Sectoar** ........ 53
Dr. D. B. Kharat, Mr. K. V. Kokare

16. **Role of Microfinance Using Regression Analysis for Women's Economic Empowerment** ........ 55
Mrs. Vanita Suresh Lingayat, Dr. H. S. Lunge

17. **Extraction & Estimation of Chlorophyll from Medicinal Plant** ........ 59
Prof. Yashoda Ramesh Neel

18. **Cloud Computing** ........ 61
Sarita Somnath Raut

19. **A seasonal hematology study in major carps cultured in Ahmednagar district, and effects of probiotic feed on fingerlings growth** ........ 66
Mr. Govind Chandrakant Nikam

**60.** **विसाव्या शतकातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाहाची जडणघडण** .......... **215**
डॉ. सखाराम मारुती वांढरे

**61.** **साहित्य और सिनेमा: बदलते परिदृश्य** .......... **217**
प्रा.डॉ. पांडुरंग अशोक दुकळे

**62.** **महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा समन्वयवादी वैचारीक अनुबंध: महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे** .......... **220**
प्रा.अजित लक्ष्मण भालसिंग

**63.** **सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे हिंदू धर्म विषयक विचार** .......... **223**
श्री सोपान लक्ष्मण नवथर

**64.** **मानसिक स्वास्थ्य एक दृष्टिक्षेप** .......... **225**
सौ. निशा बाळासाहेब खरात, डॉ. सोनुने सुभाष श्रावण

**65.** **सहकारी बँक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा** .......... **229**
डॉ. विजय आबासाहेब खर्डे, सुमित रमेश पुलाटे

**66.** **मिर्च मसाला चित्रपटातून अभिव्यक्त होणारे स्त्रीशक्तीकरण** .......... **232**
डॉ.मकसन अंबाडे, प्रा. शांता रंगनाथ गडगे

**67.** **हिन्दी साहित्य का इतिहास** .......... **234**
आरती भाऊराव पवार

**68.** **महानगरीय कथा : संकल्पना व स्वरूप** .......... **236**
श्री. भागवत बाबासाहेब देशमुख

**69.** **कवी मारुती कसाब यांच्या ''पोरगं शेकत बसलंय'' कवितासंग्रहातून व्यक्त होणारी सामाजिकता** .......... **242**
डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे

**70.** **ललितगद्याचे संकल्पनात्मक स्वरूप** .......... **248**
डॉ. निलेश खरात

**71.** **आनंद पटवर्धन यांच्या 'जयभीम कॉम्रेड' या वास्तवपटातील जात–वर्ग संघर्षाचे चित्रण** .......... **250**
डॉ. बापू चंदनशिवे

**72.** **हिंदी सिनेमा और भारतीयता** .......... **254**
प्रा. डॉ. एस. बी. कोलते

**73.** **आत्मनिर्भर भारत** .......... **257**
प्रा. संपतराव माणिकराव गर्जे

# महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा समन्वयवादी वैचारीक अनुबंधः महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे

**प्रा.अजित लक्ष्मण भालसिंग**
पी.एम.टी.एस.चे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेज, शेवगाव. जि. अहमदनगर ४१४५०२

***प्रस्तावना:** महाराष्ट्राला सामाजिक चळवळीचा प्रगल्भ वारसा लाभला आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये, परिवर्तनाचा केंद्रबिंदू म्हणून सामाजिक चळवळींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या चळवळींना प्रबोधनाच्या वाटा मोकळ्या केल्या. आधुनिकीकरणाची दिशा व आशय निर्धारित केल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात तत्कालीन सामाजिक चळवळींनी सामाजिक व राजकीय जागृती केली. जनसामान्यांना आत्मभान देण्याचे काम केले. समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेले मनोबल, धैर्य, सामाजिक निर्भयता, मूल्यनिष्ठा, रचनात्मक दृष्टी, संघर्षप्रवणता व संघर्ष बल त्याचबरोबर तत्कालीन समाज घटकांची राजकीय जाण आणि नव समाज निर्मितीचे स्वप्न व संकल्पशक्ती निर्माण करण्याचे कार्य समकालीन सामाजिक चळवळीनी केले.*

थोडक्यात महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तना संदर्भात व त्यासाठी घडून आलेल्या सामाजिक स्थित्यंतर आणि मूल्य परिवर्तनाच्या संदर्भात सामाजिक चळवळी व या चळवळींचे समाज समर्पित नेतृत्वाचे स्थान नेहमीच मध्यवर्ती राहिले. आजच्या कालखंडामध्ये भारतातील तसेच महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीचा समग्र इतिहास मांडण्याची नितांत गरज असल्याचे दिसून येते. या चळवळीमधील समान अंतरसंबंधाआधारे या चळवळीच्या नेतृत्वामध्ये समन्वय व संवादी सामर्थ्य निर्माण करून आज परिवर्तनवादी विचारधारा एकमय करण्याची गरज असल्याचे दिसून येते. तत्कालीन सामाजिक चळवळीनी जनसामान्यांना सामाजिक परिवर्तनाला सामाजिक आशय प्राप्त करून दिला. सामाजिक चळवळीचा रूप व आशय हा स्थळ, काळसापेक्ष असल्याचे आपणास दिसून येते. थोडक्यात तत्कालीन सामाजिक चळवळीकडे 'बदल किंवा परिवर्तनासाठी केलेली सामूहिक कृती' या व्यापक अर्थाने सामाजिक चळवळीचा, नेतृत्वाचा, प्रश्नांचा त्याचबरोबर परिवर्तनवादी विचारांचा सामाजिक आशय समजावून घेऊन परिवर्तनाचा विचार समग्र व संवादी भूमिकेतून अभिव्यक्त करणे निकडीचे आहे.

सामाजिक चळवळ नित्य, स्थिर समाज जीवनातील अपवादाभूत घडामोडी किंवा खळबळी नसतात तर समाज जीवनातील प्रवाहीत्व व गतीतत्व व्यक्त करणाऱ्या आणि समाजातील विविध घटकांची स्पंदने प्रकट करणाऱ्या जनरांतर घडामोडी असतात. सामाजिक चळवळ ही विविध सामाजिक मूल्याचा स्थापनेसाठी केलेला समूहाचा दीर्घकालीन वैचारिक, कृतीयुक्त संघर्ष असतो. थोडक्यात "सामाजिक चळवळी या फक्त ऐतिहासिक घटना नसतात तर भविष्यात घडू शकणाऱ्या, दडपलेल्या ऐतिहासिकतेचा तो एका बाजूला हुंकार असतो तर दुसऱ्या बाजूला भूतकाळ न घडलेल्या घडामोडींचा व बदलाचा तो वर्तमानकालीन अविष्कार असतो."[१] थोडक्यात सामाजिक चळवळी या इतिहास नामक मानवी प्रक्रियेच्या निरंतर वाहक वाहक असतात आणि इतिहासाचे माध्यम म्हणून कार्यरत असतात. महाराष्ट्राच्या समाज परिवर्तनाच्या इतिहासात ज्या दोन व्यक्तींनी सर्वव्यापी भूमिका बजावली ते म्हणजे महात्मा ज्योतीराव व न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे होय. वसाहतकालीन सामाजिक चळवळींना पश्चिमी आधुनिकतेचा आशय होता किंवा प्रेरणा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, व्यक्तींची स्वायत्तता व प्रतिष्ठा, विवेकनिष्ठा, विज्ञान भिमुखता, मानव केंद्री वैश्विकता, इहवादी दृष्टी या मूल्य आधारित समाज निर्मितीसाठी महात्मा व न्यायमूर्तींनी आजीवन संघर्ष केला व मानव मुक्तीचा इतिहास घडवला. या सांशोधन पेपरमध्ये महात्मा व न्यायमूती यांचा तौलनीक मांडणी करणाऱ्या आहे या दोन व्यक्तीमत्वामधील त्यांच्या कार्यामधील संवादी जागा शोधून चाकोरीमुक्त मांडणी करण्याचा प्रयत्न आहे तसेच समकालीन सर्वच सामाजिक चळवळीचे सामाजिक आशय समजावून घेण्याचा हेतू/उद्देश्य आहे.

दादोबा पांडुरंग यांनी संस्थापिलेली परमहंस सभा व तिचे धर्म व समाजसुधारणात्मक विचार हे महात्मा व न्यायमूर्ती यांच्या विचारधारेचा पाया होते. तत्कालीन समाजामध्ये प्रतिगामी व पुरोगामी हा वैचारिक संघर्ष सुरूच होता. प्रतिगामी लोकांच्या मते, भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या पाठीमागे पाश्चात्य राज्य, अनुकरणवाद ही मूळ प्रेरणा आहे तर समाज सुधारणेच्या समाज धुरीनांच्या मते हा मानव मुक्तीचा व सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा लढा आहे. या विषयावरती फुले व रानडे या दोघांचेही एकमत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये सामाजिक जीवनामध्ये परिवर्तनवादी विचार रुजवत असताना या दोघांनीही आपल्या विचारधारेला पाया म्हणून संस्थात्मक चळवळीचा पाया घातला उदा.प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज इ. अशा विविध संस्थांच्या माध्यमातून समाज संघटित करून या संघटित समाजाला आपल्या लेखनांच्या माध्यमातून निश्चित कार्यक्रम आपली भूमिका देण्याचे कार्य या दोघांनीही केले म्हणून आजही यांनी घातलेल्या संस्था स्वातंत्र्योत्तर काळातही कार्यरत आहेत. ज्योजीरावांच्या काळामध्ये समाज सुधारणा व सुधारक या संकल्पना नव्हत्या, तर तो वंचितांच्या हक्कांसाठी, स्त्रीविमोचनासाठी (दास्य) उभारलेला लढा होता ती मानव मुक्तीची लढाई होती. ज्योतीराव ही वांचित, शेतकरी, स्त्रिया, कामगार या सर्वांचे नेतृत्व करताना दिसतात तर न्यायमूर्ती विविध संस्थांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सामाजिक क्षितिजावर संस्थात्मक चळवळीचा पाया घातला. "न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या सामाजिक सुधारणा चळवळीचे अधिष्ठान ज्ञान ठेवले होते त्यासाठी सार्वजनिक सभेने सुरू केलेली 'वसंत व्याख्यानमालो' ने पुण्याच्या सार्वजनिक जीवनात मान्यता पावलेल्या संस्थेने निर्माण केलेली वैचारिक परांपरा अत्यंत महत्त्वाचे

ISSN : 2348-7143
June 2023

आहे.''[२] सामाजिक सुधारणांविषयी जोतिराव व न्यायमूर्ती हे दोघेही ब्रिटिश सरकारच्या भूमिकेविषयी सकारात्मक असल्याचे आपणास त्यांच्या विविध भूमिका वरून दिसून येते. महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात महात्मा ज्योतिराव प्रणित सत्यशोधक समाज व न्यायमूर्ती रानडे यांनी प्रार्थना स्थापन केलेला प्रार्थना समाज हा परिवर्तन चळवळीचा मापदंड ठरला. सत्यशोधक समाजाने आपल्या कार्यातून वंचिताचा, उपेक्षितांचा, स्त्रियांचा लढा लढवला तर प्रार्थना समाजाने शेतकरी, कामगार, वंचित यांच्यासाठी लढा दिला. प्रार्थना व सत्यशोधक समाज या दोघांचाही समान वैचारिक धागा हा एकेश्वरी तत्त्वज्ञानाचा असल्याचे आपणास दिसते. ''प्रार्थना समाजाच्या प्रचारा-प्रसारासाठी न्यायमूर्तींनी एकेश्वर निष्ठांची कैफियत (Theists Confession of fath, 1874) नावाची लेखमाला लिहिली.''[३] थोडक्यात एकोणिसावे शतक हा भारताच्या इतिहासातील एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा ठरतो. या शतकात भारतातील नवशिक्षितांचा व नवजागरणाचा, धार्मिक सामाजिक सुधारणा चळवळींचा, राष्ट्रवादाचा, यालाच साकल्याने प्रबोधन असे म्हटले जाते. परांपरा व नवता, तसेच पाश्चात्य शक्ती व भारतीय मूल्ये यांच्या संघर्षणात्मक समन्वयातून भारतीय प्रबोधन आकारास आले. प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज या संस्था या उत्क्रांत प्रक्रियेचा भाग होत्या तसेच या संस्थांच्या माध्यमातून मध्यमवर्गीय लोकांनी नवीन मूल्यांच्या प्रकाशात समाज जीवनाची घडी बसविण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही संस्थांचा मुख्य हेतू हा नव्या समताधिष्ठीत, स्वातंत्र्यधिष्ठीत मूल्यव्यवस्थेवर आधारित अशी सामाजिक संबंधाची पुनर्रचना करावयाची होती. सत्यशोधक समाज व प्रार्थना समाजाने कर्मकांड, जाती व्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, यावरती कठोर भूमिका घेतली असल्याचे दिसते.

महात्मा जोतिरावांच्या जाणिवेचा वर्गीय आशय हा आपल्याला त्यांच्या स्वअनुभवी समाजचित्रणा मधून दृष्टिक्षेपात येतो. तर याउलट पाश्चात्य शिक्षणातून सृजन झालेला नवशिक्षितांना सामाजिक संघटना, संस्था, यांच्या माध्यमातून कृती प्रणव ठेवण्याचे काम आपल्याला न्यायमूर्ती रानडे करताना दिसतात. समताधिष्ठीत समाज व्यवस्था हा प्रधान हेतू असल्याचे दिसते. सुधारकांना बोलल्याप्रमाणे वागता आले नाही ह्या पडत्या बाजूचा फायदा परांपरावाद्यांनी व्यक्ति पूजक लेखनांमधून. बुद्धीने घेतल्याचे दिसून येते. थोडक्यात प्रत्येक सामाजिक नेतृत्वाला विविध प्रसंगामध्ये स्थळ, काळ, परिस्थिती सापेक्ष मर्यादा पडल्या असल्याचे आपणास दिसते. न्यायमूर्ती रानडे यांनी प्रतिगामी लोकांच्या सामाजिक सुधारणांना होणारा विरोध नष्ट करण्यासाठी त्या सुधारणांचा पूर्ण इतिहास सांगताना रानडे म्हणतात "I the change is sought not as an innovation, but as return and estoration to the days of our past History, Those who advocate it, justify it on the . to texts revered, and admitted to be blinding to this day. The intermideate courrption and degradation was not of nations corruption and degradation was not of the nation's seeking, it was forced upon it by the predominace **of barbarous, infiveness and by the of ruthless conquerous,** That force having ceased to be operative we must not return to the old reder of things, if we are to grow to own old proportion"[४] महात्मा जोतिरावांच्या निधनानंतर न्यायमूर्तींनी त्याचा बहुजनाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला गती दिल्याचे पहावयास जमळते. ''कळसकर सर नामक ग्राहस्थ 'महाराष्ट्र स्व्हलेज एज्युकेशन सोसायटी' या संस्थेमार्फत अस्पृश्यांच्या शाळा चालवत यासाठी रानडे हे अर्थसहाय्य देत असत.''[५]

न्यायमूती व महात्मा ज्योतिराव यांच्या विचारांमध्ये आपणास धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीत यातील भूमिकाबाबत उदारम तवादी भूमिका व सर्व समावेशकता पहावयास मिळते. ''न्यायमूर्ती रानडे यांनी समाज व धर्म सुधारणेस महत्त्व देऊन राजकीय सुधारणेकडे दुर्लक्ष केले अशी तथ्य हीन टीका होते. कारण तात्विकदृष्ट्या रानडे सर्व समावेशक उदारमतवादावर विश्वास ठेवीत समाज हा जणू प्राणी आहे की ज्याच्या अंगात प्रगती व्हायची ती एकाच वेळी सवट अवयवाद होणे गरजेचे आहे. राजकीय हक्कांबाबत तुम्ही मागे पडला असला तर तुम्हाला चाांगली समाजव्यवस्था उभी करता येणार नाही. समाजव्यवस्था जोपर्यंत विवेक व न्यायावर अधिष्टीत नाही तोपर्यंत तुम्ही राजकीय हक्क वापरण्यास लायक होऊ शकत नाही. समाजव्यवस्था राज्यव्यवस्था-अर्थव्यवस्था ही सामाजिक संरचना एकमेकांस पूरक भूमिका बजावत असते. रानडेच्या मते जर तुमची धर्मसंस्था रसातळाला गेली असते तर सामा, आर्य, राज, सुधारण्याची आशा सोडा. हा विचार त्यांनी विविध ठिकाणी आपल्या लेखनामध्ये प्रतिपादला आहे.''[६] सन १८८५ साली न्यायमूर्तींनी दयानांद सरस्वतींची पुण्यात जाहीर व्याख्यान ठेवले होते नंतर त्यांची हत्तीवरून मिरवणूक काढण्यात आली होती सनातनी मंडळींनी यास तीव्र विरोध केला. या मिरवणुकीमध्ये सत्यशोधक समाजाची कार्यकर्ते सक्रियपणे सहभागी झाले. या घटनेला तत्कालीन सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात मोठा सामाजिक आशय व प्रेरणा होत्या.

न्यायमूर्ती रानडे यांनी तत्कालीन कालखंडामध्ये गंगाधरभाऊ मस्के व इतर सहकारी मित्रांच्या मदतीने ''६ जानेवारी १८८३ पुण्यातील टाऊन हॉलमध्ये सभा भरवली मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या कामे उत्तेजन मिळावे म्हणून स्कॉलरशिप देण्यासाठी 'डेक्कन मराठी एज्युकेशन असोसिएशन' ही पहिली स्वतंत्र संस्था स्थापन केली. या असोसिएशनमध्ये न्यायमूर्तींनी विद्यार्थ्यांसाठी दरमहा तीन रुपयांची स्कॉलरशिप ठेवली या संस्थेला आजीवन विद्या वेतनासाठी आपल्या मृत्युपत्रातील नोंदीप्रमाणे एक हजार रुपये चारिटी ट्रस्टमध्ये ठेवले व या रकमेचे व्याज संस्थेला अर्थसहाय म्हणून मिळण्याची व्यवस्था केली. या संस्थेच्या रूपाने मराठा समाजासाठी स्थिर संस्था स्थापन केली.''[७] या विद्यावेतना आधारे मराठा समाजातील भास्करराव जाधव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यासारखी मंडळी विद्याविभूषित होण्यासह सहाय्यभूमी ठरली. महात्मा ज्योतिराव व न्यायमूर्ती रानडे यांना सामाजिक जीवनामध्ये चळवळी करीत असताना कौटुंबिक मर्यादा पडल्या होत्या. स्त्रीदास्य मुक्तीसाठी दोघांनाही प्रतिगामी लोकांच्या विरोधात सामोरे जावे लागले. परांपरावादाचा त्रास हा ज्योतिरावाप्रमाणे रानडे यांनाही झाल्याचे दिसते. समन्वयवादी

दृष्टिकोनातून या दोघांचाही सामाजिक भूमिकांचा परामर्श घेत असताना या दोघांतील संवादी भूमिकामधून आजचे सामाजिक स्वास्थ्य व त्यांचे ऐक्य घडविण्यास पुरक ठरते.

२७ डिसेंबर १८८५ रोजी मराठी मंडळींनी पुणे येथे सयाजीराव गायकवाड यांना मानपत्र देण्याचा समारंभ ठेवला होता या ठिकाणी केलेल्या भाषणाची विवरण तत्कालीन ज्ञानप्रकाशकडे आला होता. यामधील मजकुराप्रमाणे रानडेच्या मते ''जातीभेद देशाच्या उन्नतीच्या आड येत नाही' या भूमिकेचा समाचार घेण्यासाठी ज्योतिरावांनी इशारा नामक निबंध लिहिला. ज्योतिराव व न्यायमूर्ती यांच्या विचारातील तफावत/ मातभिन्नता इशारा निबंधातून व्यक्त होते असते. बहुजनातील (अब्राह्मणी) समाजातील पृथक्करणाच्या भूमिकेला ज्योतिरावांचा विरोध असल्याचे दिसून येते. सन १८८९ सली एप्रिल मध्ये मुंबईच्या प्रार्थना समाजात सामाजिक सुधारणेबाबत केलेल्या भाषणात रानडेनी स्पष्टपणे नमूद केली की, ज्योतिरावांची वंशपरांपरेच्या उपाध्याविरुद्ध सुरू झालेली चळवळ हे धर्म जागृतीचे व समाज सुधारण्याचे चिन्ह असल्याचे मत नोंदविले. धर्मचिकित्सेबाबत ज्योतिराव व न्यायमूर्ती यांच्यामध्ये विलक्षण साम्य होते. जातीभेद अवहेरण्यासाठी परमहंस सभेने पाव खाण्याची सुरुवात केली तर ज्योतिरावांनी अत्यजाच्या हस्ते जलग्रहण केले. समाज परिवर्तनात विचार प्रगल्भ केला. ''दयानंद सरस्वती पुण्यात आले होते तेव्हा त्यांनी सत्यशोधक समाजास भेट दिल्याचा उल्लेख मिळतो.''[८]

**उपसंहार:**

उपरोक्त सांशोधनामध्ये महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला समृद्ध करण्याचे काम हे सर्वात प्रथम प्रतिक्रांतीचे जनक ज्योतीराव फुले व संस्थात्मक चळवळीचे जनक न्यायमूर्ती रानडे यांच्याकडे जाते. या दोघांनीही महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधन हे प्रचलित रूढी परंपरेच्या परखड चिकित्सेतून निर्माण केल्याचे आपणास दिसून येते. महात्मा फुले यांच्या वैचारिक जडणघडणीमध्ये, भूमिकांमध्ये, सामाजिक जाणीवेचा वर्गीय आशय हा आपल्याला त्यांच्या स्वअनुभवी समाजचित्रणामधून निर्मित झाल्याचे दृष्टीक्षेपात येते. महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे यांनी 'स्वधर्म शुद्धीतून' समाज परिवर्तनाला दिशा देण्याचे काम केले हाच त्यांच्या 'सामाजिक परिवर्तनाचा' मुळ आशय आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये गौरवीकरण भूमिकेमधून चाकोरीबद्ध मांडणीच्या आधारे व्यक्तीपूजक मांडणीस प्रारंभ झाल्यामुळे सामाजिक ऐक्य नष्ट होत चालल्याचे आपणास पहावयास मिळत आहे. इतिहासातील समाज परिवर्तनाचे, भाष्यकारांचे विलनिकरणाच्या माध्यमातून त्यांना संकुचित करण्याचा प्रयत्न होताना दिसतो आहे. अशा आजच्या स्थितीत सामाजिक चळवळी ह्या किंवा ऐतिहासिक घटिते ह्या यांच्या स्थळ काळ, परिस्थतीसापेक्ष अभ्यास होणे गरजेचे आहे. सर्व सामाजिक चळवळी, या परस्परपूरकच असतात त्या एकमेकांमधून वृद्धिंगत होत असताना कोणत्याही सामाजिक परिवर्तनामध्ये परिवर्तनवादी मुळ विचार हा प्रवाहित व अखांड स्वरूपाचा असतो त्याचे विलगीकरण होऊन शकत नाही म्हणून विलीनीकरणासाठी व्यक्तीपूजन, व्यक्तीभेदाची मांडणी केली जात असल्याचे दिसते. यावरती सर्वात प्रभावी उपाय म्हणजे सर्व सामाजिक परिवर्तनवादी चळवळीचा त्या विचारधारेचा, नेतृत्वाचा समन्वयवादी, तौलनिक पद्धतीने अध्ययन करून त्यांचा मूळ परिवर्तनवादी भूमिका, विचार प्रवाहात ठेवणे आजची खऱ्या सामाजिक ऐक्यासाठी व आपल्या उज्वल भविष्यासाठी गरजेचे आहे. थोडक्यात सामाजिक चळवळी, त्यांचे नेतृत्व यांच्या कार्याचा तौलनिक समन्वयवादी व समग्रदृष्टीकोनातून मांडणी होणे व सामाजिक समाजजीवनामध्ये चाकरीबद्ध लेखनातून निर्माण झालेला संकोचितपणा नष्ट होऊन सम ाजामध्ये संपादीभूमिका निर्माण होणे ही आजच्या सामाजिक ऐक्याची नितांत गरज आहे.

**टीपा:**

१) कुंभार नागोराव, घोटाळे विवेक, समकालीन सामाजिक चळवळी संकल्पना, स्वरूप, व्याप्ती, गुरुराज प्रिंटर्स, प्रथम आवृत्ती : ऑगस्ट २०१८, पृष्ठ ४३.

२) सरदार गं. बा. महाराष्ट्र जीवन खंड २, पुणे, १९६०, पृष्ठ ४९८.

३) वैद्य दा. गो., प्रार्थना समाजाचा इतिहास, मुंबई १९२७, पृष्ठ ३३.

४) रानडे म. गो. 'द मिसेलेनियर रायटिंग्ज ऑफ द लेट ऑनरेबल मिस्टर जस्टीस, मुंबई, १९१५ पृष्ठ ११८.

५) ठोके मो.नि. (संपा.) रा.ना. चव्हाण निवडक वाङ्मय, पारख प्रकाशन, प्रथम आवृत्तीः १९८६ पृष्ठ २०८.

६) सारवळकर एकनाथ, भेंडे सुभाष, महाराष्ट्राची मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती : १९९६ पृष्ठ ८१.

७) उपरोक्त, ठो. के. मो. नि. पृष्ठ २११.

८) महाघट ना. बा. म. जोतीराव फुले यांचे अमर विचार, दुसरी आवृत्ती, पृष्ठ २३.

९) चव्हाण रा. ना. ''सत्यशोधक ज्योतिराव फुले'' महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

**संदर्भ ग्रंथसूची:**

१. रानडे रमाबाई ''आमच्या आयुष्यातील काही आठवणी'' वरदा प्रकाशन, पुणे, जानेवारी, १९०१.
२. सरदार गंगाधर बाळकृष्ण ''न्यायमूर्ती रानडे प्रणित सामाजिक सुधारणेची तत्वमीमांसा, १९७३.
३. नंरतर रघुनाथ फाटक, ''न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे चरित्र'', नीलकांठ प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९६६.
४. चव्हाण रा. ना. लिखित, चव्हाण रमेश (संपा.) ''महात्मा फुलेः सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन'' पुणे, २००९.
५. कीर धनांजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९६८.
६. ठोके मो.नी., रा.ना. चव्हाण निवडक वाङ्मय पारख प्रकाशन, जळगाव, १९८६.


●●●

Organized by

Pravara Medical Trust's,

**Arts, Commerce & Science College,**

Shevgaon, Dist. Ahmednagar, (M.S.) India



Publisher & Printer

**Academic Book Publications**

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
**Ph.:** (0257) 2235520, 2232800. **Mob.:** 93092 60560

**E-mail : academicbooksjalgaon@gmail.com**

Price : ₹ 1000/-